# सिंहस्थ कुंभमेळा सन 2027 बाबत दिनांक 26 नोव्हेंबर 2024 रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे सन 2027 मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. त्याअनुषंगाने मा.जिल्हाधिकारी नाशिक यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची दि.26/11/2024 रोजी दुपारी 4.00 वाजता मध्यवर्ती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक संपन्न झालेली आहे.

मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांनी प्रथम बैठकीस उपस्थित सर्व अधिकारी / कर्मचारी, कार्यान्वयीन यंत्रणांचे स्वागत करुन सदर कुंभमेळा संदर्भात मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या पुर्वी झालेल्या बैठकांमध्ये दिलेले निर्देश व त्याची अंमलबाजवणी काय झाली याबाबत सविस्तर केलेल्या कामकाजाबाबत सादरीकरण करण्याचे सांगितले. त्यातील प्रमुख सुचना पूढीलप्रमाणे अनुपालनास्तव नमुद करण्यात येत आहे. या शिवाय दिलेल्या इतर सुचनांची देखली अंमलबजावणी करावी.

| अ.क्र. | जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सुचना | अंमलबजावणी करणारा विभाग / अधिकारी |
|---|---|---|
| 1 | प्रत्येक महिन्यातील आठवड्यातील प्रत्येक मंगळवारी दुपारी- 4.00 वा. मध्यवर्ती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे सर्व संबंधित शासकीय यंत्रणा यांची बैठक आयोजित होणार आहे. सदर बैठकीस मा.विभागीय आयुक्त यांचे सोईनुसार ते प्रत्येक महिन्यातील दोन मंगळवारी त्यांचे उपलब्धतेनुसार याकामाबाबत स्वत: आढावा घेणार आहेत | सर्व विभाग प्रमुख / कार्यान्वयीन यंत्रणा |
| 2 | नाशिक महानगरपालीका यांनी मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचे निर्देशाप्रमाणे त्यांनी यापुर्वी सादर केलेला आराखडा र.रु.15,172.42 कोटी मध्ये विभागनिहाय, कामनिहाय प्राधन्य क्रम निश्चित करुन जे कामकाज कुंभमेळ्याशी संबंधित आहे, त्याबाबतच पुढील आराखड्या समावेश करावा. असे निर्देश असल्याने र.रु.6978.85 कोटीचा नविन आराखडा तयार करण्यात आला असुन त्यात भुसंपादन प्रस्ताव वगळण्यात आल्याचे महानगरपालीकेचे कार्यकारी अभियंता श्री.अग्रवाल यांनी सांगण्यात आले.<br><br>साधुग्राम सुमारे 400 एकर जमीनीवर प्रस्तावित करण्याचे नियोजन असल्याबाबत चर्चा झाली त्यावर मा.जिल्हाधिकारी यांनी यात काही बदल होणार आहे किंवा कसे? याबाबत विचारणा करण्यात आली. जागेच्या संदर्भात काही वाद असल्यास ते वाद आताच मिटवावे, याबाबत संबंधिताकडे संपर्क साधुन निर्णय होणे आवश्यक आहे. तसा संदेश जनतेमध्ये जाणे क्रमप्राप्त आहे. 400 एकर जमीनीबाबत आवश्यक ती चित्रीकरण करुन असे चित्रीकरण आराखड्यामध्ये दर्शनी भागावर दाखवावे. सदर PPT मध्ये दाखविण्यात आलेल्या कामकाजावर इतर विभागांचे कामकाज अवंलबुन असल्याने इतर यंत्रणांनी या PPT मध्ये त्यांचे विभागाशी संबंधित असलेल्या | नाशिक महानगरपालीका व सर्व संबंधित विभाग |

| | | |
|---|---|---|
| | कामकाजाचे नियोजन करणे आवश्यक आहे.<br><br>तसेच पुढील काळात प्रशासनामार्फत सर्व साधुसंत, आखाडे प्रमुख यांची जिल्हास्तरावर मोठ्या प्रमाणावर बैठका आयोजित करण्याचे नियोजन असुन त्यानुसार आराखडा अद्ययावत करण्यात यावा. | |
| 3 | नगरपरिषद त्र्यंबकेश्वर – वेळोवेळी मा.विभागीय आयुक्त यांनी कुंभमेळा संदर्भात ज्या बैठका आयोजित केलेल्या होत्या, त्यातील निर्देशानुसार नविन कुंभमेळा आराखडा तयार करण्यात आला असुन तो भाग-1 व भाग-2 मध्ये दर्शविण्यात आलेला आहे. भाग-1 चे कामकाज हे तात्काळ सुरु करणे आवश्यक आहे. मागील आराखडा हा र.रु.522 कोटी रकमेचा होता. सदरचा आराखडा भाग-1 साठी 421 कोटी व भाग-2 साठी 156 कोटी असा एकूण र.रु.577 कोटी रकमेचा तयार करण्यात आलेला आहे.सदरचा आराखडा डी.पी.रोड, 60 कोटी रकमेचे प्रस्तावित असल्याने आराखड्यातील रकमेत वाढ झालेली आहे. सदर आराखडाचे सादरीकरण करीत असतांना पिण्याचे पाणी व दुषित पाणी, मलनिसारणचे काय नियोजन होणार आहे, हे स्पष्ट करणेबाबत जिल्हाधिकारी यांनी सुचना दिल्या. रस्त्यांचे वर्कआऊट करणे बाकी आहे, बऱ्याच बाबी अराखड्यात ठळक समाविष्ट केलेल्या नाही, त्या बाबींचा समावेश आराखड्यात करणेकामी सुचना देण्यात आल्या. | नगरपरिषद त्र्यंबकेश्वर / मुख्याधिकारी व संबंधित विभाग |

सदर बैठकी सर्व यंत्रणांचे अधिकारी वर्ग उपस्थित होते, त्याची यादी सोबत जोडली आहे. सायंकाळी 6.00 वाजता मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांची निवडणूक कामकाजासंदर्भात आढावा बैठक असल्याने कुंभमेळा संदर्भात उपस्थित असलेल्या इतर विभागांचा आढावा पूढील बैठकीत घेण्यात येईल, असे सांगुन सर्व उपस्थितांचे आभार मानुन सदर बैठक दुपारी 4.00 वाजता सुरु करुन सायंकाळी 5.45 वाजता खेळी-मेळीच्या वातावरणात संपविण्यात आली.

(जलज शर्मा)
**जिल्हाधिकारी नाशिक तथा सदस्य सचिव,**
**जिल्हास्तरीय कार्यकारी समिती नाशिक**